Est. Sept 1994 2(f) & 12 (B) ...

Hanuman Shikshan Prasarak Mandal, Sonpeth's

LATE RAMESH WARPUDKAR ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE, SONPETH. DIST. PARBHANI 431516 (MS)

NAAC Accredited with Grade- B

(Affiliated to: Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded)

Ph. (02453) 240 142 Fax. (02453)240 142 Principal: 09423 779 000

Web: www.warpudkarcollege.com Email:lrwcsnpt@rediffmail.com./shreyavasant2010@gmail.com

Shri. P.R. Kadam
President

Dr. V.D. Satpute
Principal

Late Ramesh Warpudkar Arts, Commerce & Science College, Sopneth Dist. Parbhani (M.S.)

# Departmental Activity Report

- Name of the Department: marathi

1. Name of the Activity: Affluency in folklore (online)
2. Date: 20/01/2022
3. Place & Time: marathi Department
4. Objectives of the Programme: 1) To explain the nature of Folk-literature
   2) To explain the importance of marathi language in folklore
5. Guests/Resource Persons: Dr. Babasaheb Dahiphale
6. Abstract of the Programme: Description of people, literature and nature of folk literature
7. Total Beneficiaries:
8. Achievements/ Outcomes: knowledge about folklore will develope in students

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar
(ACS) College, Sonpeth
Dist. Parbhani (MS)

हनुमान शिक्षण प्रसारक मंडळ सोनपेठ संचलित

# कै. रमेश वरपुडकर महाविद्यालय, सोनपेठ, जि. परभणी

Marathi विभाग /समिती

शैक्षणिक वर्ष : २०२१-२२

| भाग – अ | | |
|---|---|---|
| उपक्रम / कार्यक्रमाचे क्रमांक | | 05. |
| उपक्रम / कार्यक्रमाचे नाव | | 'मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा' व्याख्यान. * डॉ. बाबासाहेब दाढिकळे – 'लोकसाहित्यातील भाषिक श्रीमंती' |
| दिनांक- | | 20/1/2022 |
| उपक्रम / कार्यक्रमाचे स्वरूप | | * व्याख्यान. * व्याख्याते – डॉ. बाबासाहेब दाढिकळे * विषय – लोकसाहित्यातील भाषिक श्रीमंती' |
| उद्देश | १ | * लोकसाहित्य म्हणजे काय हे कळेल. |
| | २ | * लोक साहित्यातील लोक व साहित्याचा परिचय |
| | ३ | * लोकसाहित्याचे स्वरूप व प्रकार सांगणे |
| | ४ | * लोकसाहित्यातील मराठी भाषेचे रूप लक्षात |
| | ५ | * 'मराठी' भाषेची भाषिक श्रीमंती समजावणे |
| प्रमुख पाहुणे / मार्गदर्शक / व्याख्याते | | डॉ. बाबासाहेब दाढिकळे म. गांधी महाविद्यालय, अहमदपूर. |
| उद्घाटक | | online mode |
| ठिकाण | | online mode |
| उपस्थिती | विद्यार्थी | 60 |
| | कर्मचारी | 15 |
| | इतर | 30 |
| | एकूण | 105 |

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar
(ACS) College, Sonpeth
Dist. Parbhani (MS)

व्याख्यानाच्या सुरुवातीला
लोक, साहित्य व लोकसाहित्याचे स्वरूप त्यांनी सांगितले. संस्कृती, पारंपारिक
लोकसाहित्यात मौखिक आविष्कार, भौतिक संस्कृती, पारंपारिक
कलाकौशल्य, लोकसमजुती, लोकरुढीचे स्वरूप त्यांनी सांगितले
लोकसाहित्यातील भाषिक संकल्पना सांगताना त्यांनी स्त्रीगीतांचे
अनेक दाखले दिले. 'रखुमाई विचारती देवा, जनीचे काय नाते'
या लोकगीतातून शंकाच समाधान करणारा विठ्ठल तर 'ओवी'
सांगती वनवास या गीतातून त्याकाळातील स्त्रियांची दुःखं
उत्कटतेने भावना लिहितात हे त्यांनी सांगितले.

ग्रामीण भागातील स्त्रियांसमोर त्याकाळातील असणारे
आदर्श, त्यांच्याकडे पाहून त्यांना जगण्यासाठी मिळालेले बळ
याचं चित्रण अनेक गीतातून येत असल्याचे त्यांनी स्पष्ट
केले. स्त्री जातीवरील अन्याय हा सनातन आहे. पुरुषप्रधान
संस्कृतीमुळे स्त्रीची होणारी कुचंबणा याचे चित्र मांडताना, 'जीवाला
जीव देतो, जीव देऊन पाहिला / पण पाण्यातला गोटा कसा
कोरडा राहिला.' व असलेल साजिरा शब्दकळा, म्हणी, वाक्प्रचार,
अलंकार, रूपक व
सकसता, लयबद्धता, आशयार्थी शब्द, अलंकार, रूपक व
प्रतिमा यांनी ही भाषा समृद्ध असल्याचे त्यांनी सांगितले.
या कार्यक्रमाचा लाभ प्राचार्य प्राध्यापक 105 जणांनी
घेतला.

उपक्रम / कार्यक्रमाची उपयुक्तता

* लोकसाहित्यासंबंधीची जाण विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होईल.
* लोकसाहित्य व साहित्यातील फरक त्यांना समजेल.
* मराठी लोकसाहित्याचे रूप-स्वरूप व प्रकार त्यांना समजतील.
* लोकसाहित्याकडे विद्यार्थी आकर्षित होतील.
* समाजात जीवनमूल्ये रुजविण्यास मदत होईल.

भाग – क

उपक्रम / कार्यक्रमाचे खर्चाचे विवरण

| अ.क्र. | खर्च करण्यात आलेल्या वस्तूचे विवरण | आलेला खर्च (रु.) | शेरा |
|---|---|---|---|
| | Online Mode ने झाल्यामुळे खर्च निरंक. | निरंक | |
| एकूण खर्च | | 00 | |

अहवाल सादर करणाऱ्या समिती / विभाग

| पद | नाव | स्वाक्षरी |
|---|---|---|
| समिती अध्यक्ष/ विभाग प्रमुख | प्रोफेसर डॉ. काळे बी.एम. | [signature] |
| समन्वयक | प्रोफेसर डॉ. पाटील एम.बी. | |
| सदस्य | प्रोफेसर डॉ. लोखंडे<br>प्रा. डॉ. मदन एम.बी. | [signature] |

अहवाल सादर केल्याचा दिनांक : २९/ ५ / २०२२

टीप : सोबत कार्यक्रमाचे GEO TAGGED फोटो व वर्तमानपत्रातील बातम्या जोडाव्यात

Late Ramesh Warpudkar Arts, Commerce & Science College, Sonpeth Dist. Parbhani (M.S.)

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar
(ACS) College, Sonpeth
Dist. Parbhani (MS)

**भाषा संवर्धन पंधरवडा व्याख्यानमाला**

**दिवस चौथा**

*‘कला व वाङ.मयाचा मूळप्रवाह: लोकसाहित्य’ - डॉ. बालासाहेब दहिफळे.*

सोनपेठ: येथील कै. रमेश वरपुडकर महाविद्यालयात 14 जानेवारी ते 28 जानेवारी 2022 दरम्यान मराठी भाषा संवर्धन पंधरवडा संपन्न होत आहे. याचेच औचित्य साधून मराठी विभाग आयोजित व्याख्यानमालेत महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय उदगीर येथील प्रोफेसर डॉ. बालासाहेब दहिफळे यांनी ‘लोकसाहित्यातील भाषिक श्रीमंती’ या विषयावर चिंतन मांडताना वरील उद्गार काढले.

सुरुवातीला त्यांनी लोकसाहित्यातील लोक, साहित्य, स्वरूप, व्याप्ती सांगितली. लोकसाहित्यात मौखिक आविष्कार, भौतिक संस्कृती, पारंपारिक कलाकौशल्य, लोकवैद्यक, लोकसमजुती, लोकरुढी इत्यादींचा समावेश होत असतो. त्यामुळे लोकसाहित्या मध्ये लोक माणसाला खूप महत्त्व असल्याचे त्यांनी नमूद केले.

लोकसाहित्यातील भाषिक श्रीमंती सांगताना त्यांनी स्त्री गीतांचे अनेक दाखले दिले. ‘रुक्मिणी विचारती देवा जनीचं काय नातं...ऐका! शंकरा या लोकगीतातून शंकरांच्या शंकाचे समाधान करणारी पार्वती, तसेच सीता सांगती वनवास या सारख्या गीतातून अनुक्रमे श्रीकृष्ण-रुक्मिणी शंकर-पार्वती व राम-सीता यांच्या संवादातून ‘राम ग बाई नही सीतेच्या तोलाचा, हिरकणी सीताबाई राम हलक्या दिलाचा’ अशा गीतांमधील भाषिक वैभव सोदाहरण मांडले. वई..वही ते ओवी हा प्रवास तसेच ईव्हाई, बंबाट, अस्तुरी आदी शब्दकळेतील सहजता व लडिवाळपणा आजच्या भाषेत नसल्याचे त्यांनी सांगितले.

लोकगीतांमध्ये बाहेरख्याली पुरुषाला खडसावणारी घरधनीण भेटते ती तिच्या अस्सल इरसाल शब्दकळेसह.

ग्रामीण भागातील स्त्रियांसमोर असलेले आदर्श, त्यांच्याकडे पाहून त्यांना जगण्यासाठी मिळालेले बळ याचं चित्रण लोकगीतातून कसं घडतं याचे त्यांनी अनेक स्त्री गीतांची उदाहरणे देऊन स्पष्ट केले. या गीतातून ग्रामीण भागातील स्त्रियांना भोगाव्या लागलेल्या यातना त्या मांडताना दिसतात.पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्री जातीवरील अन्याय हा सनातन आहे. त्याचे चित्र काढताना ती स्त्री म्हणते ‘जीवाला जीव देते जीव, देउन पाहिला... पाण्यातला गोटा कसा कोरडा राहिला’ ... लोककथा, लोकगीते व वाक्प्रचार यांनी लोकसाहित्याच्या भाषेची श्रीमंती आपल्या नजरेत भरते, असं ते म्हणाले. त्यांनी मराठी ची भाषिक श्रीमंती सांगत असताना लोकसाहित्यातील अनेक दाखले देऊन त्यांनी मराठी भाषेतील मानवी मूल्य आणि जीवन मूल्य आपल्या समोर मांडली.

या कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष परमेश्वर कदम, प्राचार्य डॉ. वसंत सातपुते, डॉ. एम बी पाटील, मराठी विभाग प्रमुख डॉ.बालासाहेब काळे, डॉ. सा.द. सोनसळे, प्रा. सखाराम कदम, महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद, विद्यार्थी व मराठी भाषेवर प्रेम करणारे मराठी भाषिक लोक यांनी सहभाग नोंदवला.

**मराठी भाषा संवर्धन पंधरवडा व्याख्यानमाला**

**दिवस पाचवा**

*माझ्या जीवनाचं गाणं माझी कविता - संतोष नारायणकर*

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar
(ACS) College, Sonpeth
Dist. Parbhani (MS)